# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०३/२०२४ (शनिवार) सायंकाळ**

---

## नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूटमार्च

पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत मौजा पाटणसावंगी येथे २२/०३/२०२४ रोजी १७.१५ ते १८.४५ वाजता पर्यंत मा. श्री अनिल म्हस्के भापोसे सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. रवींद्र मानकर पोलीस निरीक्षक सावनेर यांचे उपस्थितीमध्ये आगामी लोकसभा निवडणूक – २०२४ शांततेत पार पडावी या दृष्टिकोनातून रूट मार्च पोलीस चौकी पाटणसावंगी – आदर्श विद्यालय– ग्रामपंचायत कार्यालय – शिवाजी चौक– बाजार चौक – मच्छी साथ – बायपास रोड पाटणसावंगी – ईदगाह – सर्विस रोड परत पाटणसावंगी चौकी पर्यंत रूट मार्च घेण्यात आला. सदर रूट मार्च मध्ये पोलीस ठाणे सावनेर येथील ५ अधिकारी, १७ अंमलदार १४ होमगार्ड व काटोल उपविभागातून आलेले एक आर पी एफ पथक ११५ अंमलदार हजर होते. तसेच १९.१५ ते २०.०० वा. पर्यंत मौजा धापेवाडा येथे ग्रामपंचायत कार्यालय – डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा – पांडे किराणा स्टोअर – शिवाजी चौक– बाजार चौक– विठ्ठल रुक्मिणी मंदिर – परत ग्रामपंचायत कार्यालय पर्यंत रूट मार्च घेण्यात आला.


POLICE

## पो.स्टे. कन्हान हद्दीत जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २२/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन कन्हान हद्दीतील गणेशनगर येथे सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर पथकाने गणेशनगर येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—१) अरविंद राजकुमार यादव, वय ३० वर्षे रा. पिपरी कन्हान २) नितेश हेमराज टेभुर्णे, वय २९ वर्षे रा. जवाहर नगर कन्हान ३) प्रतिक हरीओम प्रकाश विश्वकर्मा, वय २९ वर्षे रा. इंदिरा नगर कन्हान ४) सौरभ पंजाब वासे, वय २४ वर्ष रा. राम नगर कन्हान ५) आकाश राजन भिसे, वय ३३ वर्षे रा. राम नगर कन्हान ६) निखील प्रयागलाल उभे, वय २७ वर्षे सत्रपुर कन्हान ७) नाना मनोहर पात्रे, वय २९ वर्षे रा. सत्रापुर कन्हान ८) विदेश शाम शेंडे वय १८ वर्षे रा. मुडीकोटा ता. तिरोडा जि. गोंदीया** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०८ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन डावावर नगदी ४०००/—रू. एक प्लास्टीक पट्टी ज्यावर ५२ तासपत्त्याचे चित्र प्रिंट केले आहे. किंमती अंदाजे १००/—रू. ताब्यात घेतलेल्या इसमाचे नावे व त्याचे अंगझडतीत मिळून आलेल्या मुद्देमाल १) अरविंद यादव याचे अंगझडती वरून खिश्यातुन २००/—रू. व २) प्रतिक ओमप्रकाश विश्वकर्मा याचे जवळुन ५००/—रू. ३) सौरभ पंजाबराव रासे याचे जवळुन ४२००/—रू. ४) आकाश राजन भिसे यांचे जवळुन १२००/—रू., ५) निखील उभे यांचे जवळुन ९००/—रू., ६) नाना पात्रे याचे जवळुन ५००/—रू. ७) नितेश हेमराज टेंभुर्णे वय २९ वर्षे रा. जवाहर नगर कन्हान याचे जवळून ३००/—रू. वे असा एकुण ११,८००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे कन्हान येथे कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मार्गदर्शनात पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हान, पोहवा सचिन वेळेकर, हरीष सोनभद्रे, गेडाम, अमोल नागरे यांनी पार पाडली.

## पोस्टे काटोल हद्दीतील अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर नागपूर ग्रामीण पोलीसांची कायदेशिर कार्यवाही

मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार सा. नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर आळा घालणेकामी काटोल उपविभागात पेट्रोलिंग करीत असता दि. २३/०३/२०२४ रोजी पो. स्टे. काटोल हद्दीत मौजा खानगाव पारधी बेडा येथे अवैधरित्या गावठी पद्धतीने भट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे ०३ इसम तसेच डोंगरगाव पारधी बेडा येथे अवैधरित्या गावठी पद्धतीने भट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे ०५ इसम असे एकूण ०८ इसमांवर व स्थानिक गुन्हे शाखा स्टाफसह रेड करुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण ०८ इसम हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातून १) ४४० लिटर मोहाफूल गावठी दारू ५०/– रू लिटर प्रमाणे किंमती २२,०००/–रू. २) ७००० लिटर मोहाफूल सडवा रसायन किंमती २०/– रु लिटर प्रमाणे १,४०,०००/–रू. ३) प्लास्टिक ड्रम व इतर साहित्य किंमती ३२,०००/–रू. असा एकुण किंमती १,९४,०००/– रू. चा मदुदेमाल मिळून आल्याने नष्ट करण्यात आला. एकुण ०८ इसम **आरोपी नामे– १) विजय सुभाष पवार, वय ३२ वर्ष, रा. खानगाव २) दिनेश तेजराम मारवाडी, वय २१ वर्ष, रा. डोंगरगाव ३) साहिल मान्या सोलंकी, वय ३७ वर्ष, रा. डोंगरगाव व ०५ महिला** यांचे विरुद्ध पो.स्टे काटोल येथे वेगवेगळे कलम ६५ फ, ब, ई, क म.दा.का. महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सपोनि आशिषसिंग ठाकुर, सपोनि शेळके, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखेडे, सफौ. चंद्रशेखर गडेकर, पोहवा प्रमोद तभाने, दिनेश अधापुरे, गजेंद्र चौधरी, संजय बांते, मयुर ढेकळे, किशोर वानखेडे, रोहन डाखोरे, नापोशि अमृत किनगे, विपीन गायधने, शंकर मडावी, रंजित जाधव, विरेंद्र नरड, मिलींद नांदुरकर, पिपरोदे, रोशन काळे, राजू रेवतकर, सत्यशील कोठारे, मपोहवा कविता बछले, नितू रामटेके, नम्रता बघेल, महिला पोलीस नायक वनिता शेंडे, पोशि राकेश तालेवार, चालक सुमित बांगडे, आशुतोष लांजेवार, अभिषेक देशमुख, अमोल कुथे यांनी केली.



**पोस्टे काटोल हद्दीतील अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर नागपूर ग्रामीण पोलीसांची कायदेशिर कार्यवाही**

दि. २२/०३/२०२४ रोजी सकाळी ०६/०० वा. पोलीस स्टेशन काटोल येथील पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम सोबत, सहायक पोलीस निरीक्षक नागवे, पोलीस हवालदार लखन महाजन, पोलीस नाईक प्रवीण पवार, रणजीत रोकडे, विकास वाईकर, गुलाब भालसागर, रमेश काकड, वसंता नागरे, अस्मिता गायकवाड, सविता आहाके, असा पोलीस ठाणे काटोल येथील पोलीस स्टाफ सोबत घेऊन पोलीस ठाणे काटोल अंतेर्गत येणाऱ्या मौजा डोंगरगाव पारधी बेडा येथे दारू बाबत रेड केली असता अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारे एकुण १० इसम हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून ४८०० लिटर मोहाफुल रसायन सडवा व १७० लिटर मोहाफुल गावठी दारू एकूण किंमती १,१६,५००/— रुपयाचा अवैधरित्या मुद्देमाल मिळून आल्याने **०७ महिला व ३ पुरूष नामे— १) नितेश रवी पवार, रा. घुबडमेट २) दिनेश तेजराम मारवाडी रा. डोंगरगाव काटोल ३) साहिल माने सोलंकी रा. डोंगरगाव काटोल** असे एकुण १० इसमांविरूद्ध पो.स्टे काटोल येथे वेगवेगळे कलम ६५, ई म.दा.का. महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम सोबत, सहायक पोलीस निरीक्षक नागवे, पोलीस हवालदार लखन महाजन, पोलीस नाईक प्रवीण पवार, रणजीत रोकडे, विकास वाईकर, गुलाब भालसागर, रमेश काकड, वसंता नागरे, अस्मिता गायकवाड, सविता आहाके यांचे सह कार्यवाही करण्यात आली आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर